**उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनांतर्गत पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात रक्कम थेट जमा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : स्कॉलर-४९१७/प्र.क्र.१४६/मशि-२,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०२ ऑगस्ट, २०१७.

<u>वाचा</u> **:-** (१) महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थ सहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६.
(२) शासन अधिसूचना, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांक:स्कॅालर-४९१७/ प्र.क्र.१४६/मशि-२, दिनांक२९.०६.२०१७.

**<u>प्रस्तावना :-</u>**

गुणवान व होतकरू विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाकडून देण्यात येणाऱ्या काही शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजना उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येतात.

२. संदर्भाधिन क्र. १ येथील महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थ सहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६ मध्ये शासनाकडून देण्यात येणारे कोणतेही आर्थिक सहाय्य, लाभ व सेवांच्या प्रयोजनार्थ संबंधित लाभार्थ्यांचे अधिप्रमाणन किंवा पुरावा म्हणून आधार क्रमांक प्राप्त करून त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात वित्तीय लाभाची रक्कम थेट जमा करण्याची तरतूद केली आहे. सदर अधिनियमातील कलम ३ व ४ मधील तरतुदीनुसार संदर्भाधीन क्र.२ येथील अधिसूचनेन्वये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत विद्यार्थ्यांना राज्य शासनाकडून देण्यात येणारी शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनांची सूची व सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी ओळख सिद्ध करण्याच्या प्रयोजनार्थ ओळखीचे अधिप्रमाणन किंवा पुरावा अधिसूचीत केले आहेत. त्यानुसार अधिसूचीत केलेल्या शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनांचा लाभ देण्याच्या प्रयोजनार्थ संबंधित लाभार्थ्यांचे अधिप्रमाणन किंवा पुरावा म्हणून आधार क्रमांक प्राप्त करून, त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात वित्तीय लाभाची रक्कम थेट जमा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

३. तरी संदर्भाधीन क्रमांक २ येथील अधिसूचनेमध्ये अधिसूचित केलेल्या शिष्यवृत्ती/ आर्थिक सहाय्य योजनेंतर्गत पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांना देण्यात येणारी लाभाची रक्कम ही थेट लाभार्थ्यांस त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात शासनाकडून जमा करण्यासाठी पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

संदर्भाधीन क्रमांक १ येथील महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थ सहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६ मधील तरतूदी व संदर्भाधीन क्रमांक २ येथील

अधिसूचना विचारात घेवून, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील **परिशिष्ट "अ"** मधील शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या लाभाची रक्कम संबंधित महाविद्यालयांना देण्याऐवजी, पात्र लाभार्थ्यांस थेट त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात जमा करण्यात यावी.

२. प्रस्तुत शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी समन्वय अधिकारी म्हणून संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे राहतील. तसेच, सहाय्यक संचालक (लेखा), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना उक्त शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेकरीता आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या लाभाची रक्कम पात्र लाभार्थ्याच्या आधार संलग्नित बँक खात्यात जमा करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती विहित करण्यात येत आहे :-

(१) **परिशिष्ट "अ"** मध्ये नमूद केलेल्या शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेच्या लाभासाठी शासनाने वेळोवेळी निश्चित केलेली कार्यपध्दती, अटी, शर्ती व निकष लागू राहतील.

(२) अर्जदार विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेसंदर्भातील ऑन-लाईन अर्जासोबत त्यांच्या आधार क्रमांकाबरोबरच आधार संलग्नित बचत बँक खात्याचा तपशिल द्यावा. संबंधित शैक्षणिक संस्था/महाविद्यालये/विद्यापीठे/सक्षम प्राधिकारी यांनी सदर योजनेसंबंधीच्या शासन निर्णयान्वये वेळोवेळी विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार प्राप्त अर्जांची छाननी करावी व DBT पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

(३) शैक्षणिक संस्था/विद्यापीठे/महाविद्यालयांनी प्रत्येक विद्यार्थ्याचा प्रवेश निश्चित करताना त्यांचा आधार क्रमांक हा संबंधित शैक्षणिक संस्था/विद्यापीठ/महविद्यालयाच्या सांकेतिक क्रमांकाशी (Unique Number) (AISHE Code अथवा शैक्षणिक संस्था/ विद्यापीठ/महाविद्यालयाने दिलेला नोंदणीकृत क्रमांक) जोडून त्याआधारे विकसित केलेली विद्यार्थ्यांची परिपूर्ण माहीती (Data Base) ही प्रस्तावित DBT पोर्टलशी जोडण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना उपलब्ध करुन द्यावी.

(४) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रत्येक योजनेकरिता राष्ट्रीयकृत बँकेत एक संयुक्त खाते उघडून त्याद्वारे लाभार्थी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती राज्यस्तरीय DBT पोर्टल मार्फत अदा करण्याची कार्यवाही करावी. वर नमूद खात्याव्यतिरिक्त इतर कोणतेही खाते जिल्हा/तालुका/विभागस्तरावर ठेवण्यात येऊ नये.

(५) उच्च शिक्षण संचालनालयाने शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेची माहिती महाविद्यालयाच्या सांकेतिक क्रमांकासह (Unique Number) विद्यापीठ/

महाविद्यालयाचा नोंदणीकृत क्रमांक (AISHE) DBT पोर्टलला जोडण्याची कार्यवाही करावी.

(६) सदर प्रयोजनार्थ माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडून केंद्रीभूत थेट लाभ हस्तांतरण पोर्टल विकसित करण्यात येत असून, यासंदर्भात वेळोवेळी मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येईल. शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनेसंदर्भातील अर्ज करण्यापासून शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्याची रक्कम लाभार्थी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात जमा करण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रियेसाठी राज्यस्तरीय DBT पोर्टलचा वापर करणे अनिवार्य राहिल.

(७) पात्र लाभार्थ्यांनी त्यांचा आधार क्रमांक हा ऑन-लाईन अर्जासोबत देणे आवश्यक असेल. तसेच ज्या बँक खात्यात पात्र लाभार्थ्यांना रक्कम प्राप्त करुन घ्यावयाची आहे, असे खाते ऑन-लाईन अर्जासोबत दिलेल्या आधार क्रमांकाशी संलग्न असल्याची खात्री करुन घ्यावी.

(८) उक्त योजनेअंतर्गत सध्या लाभ घेत असलेले व नवीन लाभार्थी विद्यार्थ्यांना यापुढे राज्यस्तरीय DBT पोर्टलवर नव्याने अर्ज करणे अनिवार्य राहिल. या योजनांतर्गत पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्याची रक्कम अदा करतेवेळी लाभार्थी विद्यार्थी, अभ्यासक्रम व शैक्षणिक संस्था/महाविद्यालय/विद्यापीठनिहाय सविस्तर यादी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी उच्च शिक्षण संचालनालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्याची असेल. तसेच सदर यादी उच्च शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर न चुकता प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१७०८०२१६१६१४४४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rohini Bhalekar

Digitally signed by Rohini Bhalekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=440c600559857f4234e969f892346c88247ac81346a1b7229bf9917deb7bce48, cn=Rohini Bhalekar
Date: 2017.08.02 16:18:20 +05'30'

**( रोहिणी भालेकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.मंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,

४. मा.राज्यमंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई,
५. सर्व मा. मंत्री व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. प्रधान सचिव (कृषि), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधि द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) मंत्रालय, मुंबई,
१०. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
१३. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१४. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे (सदर शासन निर्णय सर्व शैक्षणिक संस्था/ सर्व महाविद्यालये/ सर्व विद्यापीठे यांच्या निदर्शनास आणण्यात यावा.)
१५. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,
१६. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत)
१७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
१८. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
१९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२१. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२२. उपसचिव (मशि/विशि/तांशि) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई,
२३. कक्ष अधिकारी, मशि-३, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई,
२४. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक,
२५. निवड नस्ती मशि-२.

## परिशिष्ट “अ”

| अ.क्र. | योजनांची नावे |
|---|---|
| १ | हिंदी मधील मॅट्रिकोत्तर अभ्यासासाठी अहिंदी भाषिक राज्यातील विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| २ | राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती |
| ३ | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| ४ | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती |
| ५ | एकलव्य आर्थिक सहाय्य |
| ६ | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य |
| ७ | राज्य शासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती |
| ८ | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती |
| ९ | जवाहरलाल नेहरू विद्यापीठ शिष्यवृत्ती |
| १० | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |
| ११ | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |

(2)

RULE : 8 : Fellowship may be taken away by the Principal, the College for misconduct or unsatisfactory progress or failure to carry out any of the conditions of Rule 3 above.

RULE : 9 : If a fellow fails to appear for a Master's Degree Examination at the end of the second year, or having appeared, fails in the examination, he will not be paid for the last three months of the year.

RULE:10 : The followships earmarked for Universities should be placed at their disposal for allotment to the different faculties at their discrection. They should be awarded to the best student in the faculty chosen by the University taking the first University Degree with at a first class/second class and prosecuting post-graduates studies under the University one fellowship at least being allotted to deserving students in each of the University Departments, if any.

RULE : 11 : No student in a Government College should be allowed to hold concurrently a fellowship of the College and fellowship earmarked for the University.

RULE : 12 : The stipends of the fellows in Government Colleges will be drawn quarterly in arrears on bills signed by the Principal, without the countersignature of the Director of Education and of fellows in other colleges on bills signed by the ~~Exxxx~~ Principal and countersigned by the Director of Education for the 12 months beginning from the first day of the month in which the academic year begins e.g. If the academic year begins in June, the first bill will be drawn for the month of June, July and August.

RULE : 13 : Candidates selected for fellowships who did not wish to claim the money of the fellowships, will on the recommendation of the common room and approval of the Principal of the College be designate as Honorary Fellows.

Similarly, candidates who are gainfully mployed but are otherwise eligible for fellowships will, on the recommendations of the common room and approval of the College be designated as Honorary Fellows but they will not be paid money value of the fellowships.

RULE : 14 : Student who are gainfully employed should not be eligible the grant of fellowship i.e. the money value of the Fellowship. Student in receipt of Fellowships will not accept any gainful employment (during) the tenure of the Fellowship, except with the previous sanction of Government.

RULE : 15 : Students ensuring more than one course simultaneously should not be held eligible for a fellowship nor will the students taken any additional course while in receipt of fellowship.

* * * * *

HDP/12101983

Revised Rules for the award of Government Daxina Fellowships and Government Fellowships in Colleges and Universities.

6

* * * * *

RULE NO. 1 : The 76 Government and Daxina Fellowships should be distributed between the Government Colleges and the Universities as follows and their value should be Rs.60/each.

| Sr.No. | Government Colleges | No.of sets of Fellowships |
|---|---|---|
| 1. | Elphinstone College, Bombay | 6 |
| 2. | Institute of Science, Bombay | 6 |
| 3. | Ismail Yusuf College, Jogeshwari | 4 |
| 4. | Sydenham College of Commerce & Economics, B'bay | 4 |
| 5. | Govt.Law College, Bombay | 4 |
| 6. | Rajaram College, Kolhapur | 6 |
| 7. | College of Science, Nagpur | 6 |
| 8. | Nagpur Mahavidyalaya, Nagpur | 6 |
| 9. | Vidarbha Mahavidyalaya Amravati | 6 |
| 10. | Govt.Arts & Science College, Aurangabad | 6 |
| | | 54 |
| | UNIVERSITIES | |
| 1. | Bombay University, Bombay | 4 |
| 2. | Poona University, Poona | 4 |
| 3. | Nagpur University, Nagpur | 4 |
| 4. | Marathwada University, Aurangabad | 4 |
| 5. | S.N.D.T.Women's University | 2 |
| 6. | Shivaji University, Kolhapur | 4 |
| | | 22 |

RULES : 2 : The fellowships are open to those who have obtained a first class at the first degree of any of the following Universities, (1) Bombay, (2) Poona, (3) Nagpur, (4) Marathwada, (5) S.N.D.T.Women's (6) Shivaji University.

The condition of securing a first class at the first degree examination for the award of the fellowships may be relaxed in favour of students securing a second class at the first degree examination subject to the condition that the requisite number of candidates fulfilling the condition are not available and the fellowships are likely to remain vacant on that account. In the case of candidates where the condition of obtaining a first class at the first degree examination is relaxed, the award should be made on the basis of distinctive merit as determined by the percentage of marks obtained at first degree examination. The Principals of Colleges are permitted to restrict the lower percentage of marks for their colleges as may be determined by room considers that no useful purpose will be served by awarding fellowships to student obtaining a lower second class. Fellowships allotted to the Universities are ope to students reading in University Departments in subject such

, Science, Law and Commerce ( i.e. Humanities and Social nces) as well as Non-Government Colleges in Arts, Science and Commerce Colleges, affiliated to the Universities cerned ).

RULE : 3 : Fellows will be required :

a) to read for a Master's degree of one of the Universities mentioned in Rule (2) above.

b) to assist in the tutorial and administrative work of the College as required by the Principal.

c) to reside in and assist in the work of superintending the hostel, if so, required.

d) In case a fellow is allowed to enrol himself at the University Department or at another college in the same place for lack of facilities in Government Colleges the provision of sub-rules (b) and (c) may be relaxed by the Principal in his descretion.

e) the case in which fellows are unable to read in the same place for their degrees in the chosen subjects will be dealt with individually on merits.

f) Such of the fellows who are allowed to register at other colleges or in Universities will not be eligible for an exemption of fees, etc. which is available under Rule 4 only in respect of the fees etc.payable at Govt.Colleges.

RULE : 4 : Fellows in Government colleges will not require to pay the college share of the ordinary tution fees for the courses which they are allowed to take at the College. They will be required to pay on the University share of the fees. They will also not be required to pay hostel rent if called upon to reside in the hostel under Rule 3 above.

RULE : 5 : The fellowships in Government colleges will be awarded by the Principal on the jomination of the Common Room of the College to which the fellowship is ssigned. They will be awarded strictly on the basis of merit and performance at the degree examination subject to the condition that exception for special reasons not more than one fellowship will be allotted in each subject and that the fellowship allotted to the college will be equally split up for Arts and Science subjects. Cases of doubts or dispute will be referred to the Director of Education for decision.

RULE : 6 : The names of the fellows appointed shall be submitted by the Principal to the Director of Education within forthnight of the appointment. Appointments of fellows shall in no case be delayed beyond the end of the first term of each academic year. ~~x xxxxxxxxxxx xxxx~~ The Director of Education shall submit every year a consolidated list showing the fellowships awarded, the names of the fellows, the subjects of Post-Graduate study and the details of their University career for the information of Govt.

RULE : 7 : Fellowships will be tenable ordinarily for two years subject to good conduct, regular attendance and satisfa--ctory progress. If a fellow fails to show sufficient progress at the end of the first year the fellowship awarded to him may be discontinued by the Director of Education on the recommendation of the Principal.

—इ. शिक्षा शिक्षवृत्ति

(3)

Government Daxina Fellowships & Government Fellowships : Award of:-

(ε)

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Education and Social Welfare Department,
Addendum No.SCH 1065-U,
Sachivalaya Annexe, Bombay-32, 29th September 1965.

Read:- Government Resolution, Education Department No.SCH 1051/39148-U, dated the 27th July 1953.

Government Resolution, Education & Social Welfare Department No.Sch-1064-U, dated the 2nd June 1965.

ADDENDUM: Government is pleased to direct that Rule No.1 and Rule No.2 of the rules governing the award of Government Daxina Fellowships and Government Fellowships, originally approved under Government letter, Education & Social Welfare Department No.SCH-1051/39148-U, dated the 27th July 1953, and amended from time to time, should be further amended as follows:-

Rule No.1.

(a) For the number 66 appearing in the first line substitute the number 76.

(b) Under the heading Government Colleges, the following should be added as entry No.10) after entry No.9)
10) colleges ofarts and Science Aurangabad 6.

(c) For the figure "48" indicating the total number of seats in Government colleges, the figure "54" shall be substituted.

(d) Under the heading universities, the following should be added as entry no.6) after entry no.5)
6) Shivaji University, Kolhapur. 4.

(e) For the figure "18" indicating total number of seats in the universities, the figure "22" shall be substituted,

Rule No. 2.

The Following should be added as entry no.(6) after entry No.(5)
(6) Shivaji University.
By order and in the name of the Government of Maharashtra,

( G. P. CHITALE )
Under Secretary to Government.

To,
The Director of education, Maharashtra State, Poona.
The Accountant General, Bombay.
The Pay and Accounts Officer, Bombay.
The Finance Department (Br.II)
The Principals of:-
Elphinstone College, Bombay.
Institute Of Science, Bombay.

[illegible]/8/5/1935

P.T.O.

सुधारित ...



राज्यशासनाच्या शिष्यवृत्त्या
दरात सुधारणा...

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

शासन निर्णय क्र. एससीएच २००३/(४०५/०३)/मशि-१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ५फेब्रुवारी,२००४

पहा :- १) शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग क्र. एससीएच १०६५-यु, २९ सप्टेंबर, १९६५.

२) शासन निर्णय, शिक्षण, क्रीडा व समाजकल्याण विभाग क्र. एससीएच १४७०/ १०७५७२/ एस, दिनांक १४ मे, १९७१.

३) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एससीएच १०८२/ ४१९९/ विशि-३, दि. १३ ऑगस्ट,१९८५.

४) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एससीएच १०८५/ ५०६२००/ (२६५१) दि. २१ ऑक्टोबर,१९८५.

५) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. विपरा-१०९३/ ६५५२७(८०)/ मशि-४, दि. १ जुलै,१९९४.

६) शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं / शिष्य/ योजना / बदल /१४-अई , दिनांक २४ जुलै,२००३.

७) विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. एफ.१९-१/२००२(SA-I/ Policy), दिनांक ५-२-२००३.

८) शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं / शासंअछा/येलेरे / बदल /१४-अई /१४१९, दिनांक २७ जानेवारी,२००४.

## शासन निर्णय

उच्च शिक्षणाच्या अंतर्गत असणा-या विविध शिष्यवृत्त्यांच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता या निर्णयाद्वारे राज्य शासनाच्या खालील शिष्यवृत्त्यांच्या दरात त्यासमोर दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यास मंजूरी देत आहे :-

| अ.क्र. | शिष्यवृत्तीचे नाव | संच | सध्याचे दर | सुधारित दर २००३-०४ पासून |
|---|---|---|---|---|
| १. | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती | १४ | रू. ४००/-दरमहा + रू. ५०/- दरमहा सादिलवार खर्च | रू. ७५०/- दरमहा +रू.१०००/- वार्षिक सादिलवार खर्च |
| २. | राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती | १२०८ | रू.३५/-दरमहा | रू.१००/-दरमहा |
| ३. | राज्यशासनाची दक्षिणाअधिछात्रवृत्ती | ७६ | रू. ६०/- दरमहा | रू. २५०/- दरमहा |
| ४. | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती. | १०० | रू.४०/-दरमहा | रू.१००/-दरमहा |
| ५. | जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली.. शिष्यवृत्ती | १ | रू. ५०००/-दरमहा + रू. ५०००/- वार्षिक सादिलवार | रू. ८०००/-दरमहा + रू. १००००/- वार्षिक सादिलवार |

२. यावरोबरच एकलव्य आर्थिक सहाय्य योजनेसाठी असलेली उत्पन्नाची मर्यादा रू.३५,०००/- ऐवजी रू. ७५,०००/- करण्यास व गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देण्याकरिता वरिष्ठ महाविद्यालयांच्या बाबतीत नुतनीकरणासाठी किमान ६५% गुण व कनिष्ठ महाविद्यालयांच्या बाबतीत नुतनीकरणासाठी किमान ५५% गुण आवश्यक करण्यास याद्वारे शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

३. यावर होणारा खर्च " २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०३, विद्यापीठीय व उच्च शिक्षण" या प्रधान शीर्षाखाली व संबंधीत उपशीर्षांखाली मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय २००३-०४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाबाबत प्रधान सचिव,वित्त यांच्याकडे दिनांक १६.१.२००३ रोजी झालेल्या बैठकीत देण्यात आलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु. द. पडवळ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व सह संचालक, उच्च शिक्षण, प्रादेशिक विभाग.
महालेखापाल (लेखा परीक्षा )-१/२, महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर .
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई .
कोषाधिकारी, पुणे.
नियोजन विभाग / वित्त विभाग.
उच्च व तंत्रशिक्षण विभाग ,कार्यासन-(साशि-१).
निवड नस्ती (साशि-१).